महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१

दूरध्वनी क्र .०२२-२२८३९९२४ Email ID :.usecpr३.rdd-mh@nic.in

---

क्रमांक : ई-1704297/ संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१५६/पंरा-३ दि. ०३ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :** शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र.२३७/पंरा-३, दि. २२.०९.२०१७ अन्वये, ग्रामीण भागात इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देणेबाबत.

**संदर्भ**-(१) ग्राम विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र.व्हीपीएम २०१५/प्र.क्र.२३७ /पंरा-३, दि. २२.०९.२०१७
(२)उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.इबांका २०२१ /प्र.क्र.१४८/कामगार-७, दि.२३.०९.२०२१
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.इबांका-०३२५/प्र.क्र.३२/ कामगार-७,दि.१४.०५.२०२५ व दि.०८.०४.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक (१) येथे नमूद परिपत्रकान्वये बांधकाम कामगाराने मागील १२ महिन्यांमध्ये ९० दिवस काम केल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भाधीन क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयान्वये ग्रामीण व शहरी भागात तत्परतेने आणि गतीने नोंदणी होण्याकरीता "नोंदणी अधिकारी" घोषित केले आहेत. तथापि, कामगार विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, दि.२३.०९.२०२१ मुळे ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीचे परिपत्रक अधिक्रमित झाले असल्याचा ग्रामसेवक युनियन यांचा समज झाल्यामुळे बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करणे थांबविले असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील ग्राम पंचायत अधिकारी बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबत प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करीत नसल्याने, कामगार मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांपासून बांधकाम कामगार वंचित राहत असल्याबाबत मा. लोकप्रतिनिधी/विविध संघटना यांचेमार्फत शासनास निवेदने प्राप्त झाली. त्यानुषंगाने मा. मंत्री (कामगार )यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०८.०४.२०२५ रोजी यासंदर्भात बैठक संपन्न झाली.

२. उपरोक्त बैठकीत, ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रामीण भागात इमारत व इतर बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत दिलेल्या सूचना कायम असून त्यासंदर्भात ग्रामविकास विभागामार्फत उक्त परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सूचना देण्याबाबत मा. मंत्री (कामगार) यांनी निर्देश दिले आहेत. (प्रत सोबत)

३. या अनुषंगाने ग्राम विकास विभागाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या परिपत्रकातील सूचना कायम असून, त्यानुसार बांधकाम कामगारास ९० दिवस काम केल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबतच्या निर्देशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, असे आपल्या स्तरावरून संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, ही विनंती.

आपला,

(मनोज नुक्ते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत –

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व)

बांधकाम कामगारांची ग्रामपंचायत स्तरावर
नोंदणी करणेबाबत

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम २०१५/प्र.क्र. २३७/पंरा-३**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,

मुंबई - ४०० ००१

तारीख : २२ सप्टेंबर, २०१७

वाचा

**शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र. २३७/पंरा-३ दि.१६/११/ २०१५**

प्रस्तावना

शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०१५/प्र.क्र. २३७/पंरा-३ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ अन्वये बांधकाम कामगारांची ग्रामपंचायत स्तरावर नोंदणी करण्याबाबत सर्व स्थानिक संस्थांना निर्देश देण्यात आले आहेत. सदर परिपत्रकासोबत देण्यात आलेल्या नमूना प्रमाणपत्रामध्ये बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केल्याचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. या त्रुटीचा गैरफायदा अपात्र लाभार्थी घेत असल्याची शक्यता कामगार आयुक्तांनी वर्तवली आहे. त्या अनुषंगाने सुधारित प्रमाणपत्र देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक

उपरोक्त नमूद परिस्थितीत शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग दिनांक १६/११/२०१५ च्या सोबतच्या प्रमाणपत्रात बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केल्याचा उल्लेख नसल्याने, या परिपत्रकासोबत जोडलेल्या सहपत्रातील प्रमाणपत्रात बांधकाम कामगारास नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत आवश्यक कार्यवाही सर्व स्थानिक संस्थांनी करावी. तसेच सदर प्रमाणपत्र देताना कामगारांच्या वास्तव्याचा अधिकृत पुरावा व अधिकृत फोटो असलेल्या ओळखपत्राचा नमुना अर्जासोबत घेण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२२१४२९२३१७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neela S Ranade

Digitally signed by Neela S Ranade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa000534746db92f0157755df1a70d0797969b5baca3c22211cde2ca05529e3, cn=Neela S Ranade
Date: 2017.09.25 12:36:05 +05'30'

(नीला रानडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
१०. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१३. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)
१४. कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरचा शासन निर्णय विभागाच्या नागरीकांची सनदवर प्रसिध्द करावा.
१५.निवडनस्ती-कार्यासन पंरा-३.

शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम २०१५/प्र.क्र.२३७/पंरा-३
दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ सोबतचे सहपत्र

प्राधिकरणाचे नाव व पत्ता ..........................................................
..........................................................
..........................................................

## प्रमाणपत्र

(बांधकाम कामगाराने मागील एका वर्षात ९० दिवस काम केल्याचा दाखला)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती .......................................................... वय...................नाका बांधकाम कामगार म्हणून .....................नाक्यावर रोजंदारीवर बांधकामाचे काम करतात. त्यांनी मागील वर्षात ९० दिवसांपेक्षा अधिक दिवस खालील मालकांकडे काम केलेले आहे.

| अ.क्र. | मालकाचे नांव | मालकाचा पत्ता | कामाचे स्वरुप | कालावधी | | मालकाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| **मागील वर्षभरात काम केलेले एकूण दिवस** | | | | | | |

श्री/श्रीमती ................................................ हे बांधकाम कामगार म्हणून काम करीत असल्याची खात्री केलेली असून त्याबाबत आज दिनांक ............................... रोजी प्रमाणपत्र देत आहे.

प्राधिकृत अधिका-याचे नांव ..........................................
पदनाम ..........................................
स्वाक्षरी ........................................

१. बांधकाम कामगाराचे नांव ........................................
२. पत्ता ..................................................................
३. मोबाईल नंबर ..........................................